पुढारी



# जिनगोंडा पाटील यांच्याकडून भगवान महावीर अध्यासनास देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी जिनगोंडा पाटील यांनी ५० हजार रुपयांची देणगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. जिनगोंडा पाटील हे मूळचे कोगनोळी येथील असून कागल येथील यशवंतराव घाटगे हायस्कूलमध्ये (पूर्वीचे कागल विद्यालय) शिक्षक होते. देणगीबद्दल कुलगुरूंसह सर्व उपस्थितांनी त्यांना धन्यवाद दिले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, चंदन डवर, प्रा. बी. डी. खणे, पुष्पाताई पाटील, प्रा. डॉ. विजय ककडे उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठातील महावीर अध्यासनास जिनगोंडा पाटील यांच्याकडून मदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी जिनगोंडा आप्पा पाटील यांनी भगवान महावीर अध्यासनास ५० हजारांची देणगी दिली. जिनगोंडा पाटील यांनी या रक्कमेचा धनादेश सोमवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, चंदन डवर, प्रा. बी. डी. खणे, पुष्पाताई पाटील उपस्थित होते. जिनगोंडा पाटील हे मूळचे कोगनोळी येथील आहेत. कागल येथील यशवंतराव घाटगे हायस्कूलमध्ये ते शिक्षक होते. भगवान महावीर अध्यासनासाठी व्यक्ती व संस्थांना मदतीचे आवाहन अध्यासनातील प्रा. विजय ककडे यांनी केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा मे महिन्यात घेण्याचा निर्णय

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र संपवून उन्हाळी सत्र परीक्षा मे महिन्यात घेण्यासंदर्भात समिती नेमण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषद बैठकीत घेण्यात आला. दोन दिवसांत ही समिती अंतिम निर्णय घेणार आहे.



- **व्यवस्थान परिषद बैठकीत मान्यता; विविध विषयांवर चर्चा**

व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. बैठकीत २९ विषयांवर चर्चा झाली. यातील १६ नियमित तर १३ आयत्यावेळी घेण्यात आले. विविध विषयांवर चर्चा होऊन मान्यता देण्यात आली. विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र लांबले असून परीक्षा जून महिन्यात घेण्याचे नियोजन केले होते. याबाबत संस्थाचालक, प्राचार्य यांनी वेळेत परीक्षा घेण्याची मागणी केली. त्यानुसार आयत्या वेळच्या विषयांमध्ये याबाबत चर्चा होऊन कमिटी नेमण्यात आली. लवकरच परीक्षा मंडळ, विद्या परिषद व त्यानंतर व्यवस्थापन परिषदेची तातडीची बैठक घेऊन अंतिम निर्णय होईल. सामाजिक वंचितता विभागास विद्यापीठ फंडातून ५० लाख रुपयांचे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच चेंजिंग स्टाफ, सेवा सलगता, महाविद्यालयात नवीन समित्या स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, अमरसिंह राजपूत आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठातील ८ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातंर्गत बॅचरल ऑफ फार्मसी, बी.एड्, एम.एड्. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या ऑफलाईन परीक्षा सोमवारी सुरळीत झाल्या. तर एम.ए. भाषा प्रद्योजिकी सेमी १, एम.ए. रशियन लँग्वेज सेमी १, एम. ए. हिंदी सेमी १, एम. ए. राजशास्त्र सेमी १, एम. ए. मानसशास्त्र सेमी १, एमबीए सेमी ३, एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी सेमीस्टर १ या परीक्षांचे निकाल घोषित झाले. आजअखेर ५०८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.